# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली— ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail :gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/ 711 /2021 दिनांक 26/11/2021

अत्यंत तातडीचे/कालमर्यादित

## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :— दिनांक २५/१०/२०२१ ते ०२/११/२०२१ पर्यंतची कोवीड लसीकरणाबाबतची माहीती तात्काळ सादर करण्याबाबत

संदर्भ :— १. मा. सहसंचालक यांचे कार्यालयांचे पत्र क्रमांक उशिनाग/आस्था/सर्व महा./७६५२/२०२१ दिनांक २५/११/२०२१
२.विद्यापीठाचे पत्र क्रमांक ९४६०/२०२१ दिनांक २१/१०/२०२१ नुसार

महोदय

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, कोवीड —१९ च्या महाराष्ट्र शासनाच्या “ मिशन युवा स्वास्थ ” या अभियानाअंतर्गत महाविद्यालय स्तरावर दिनांक २५ ऑक्टोंबर २०२१ ते दिनांक २ नोव्हेंबर २०२१ या दरम्यान कोवीड—१९ लसीकरण अभियान राबविण्याबाबतचे विद्यापीठाच्या संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकानुसार कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडुन राबविण्यात आलेल्या मोहिमेमध्ये विद्यार्थ्यांच्या लसीकरणाबाबतची माहिती सोबत संलग्नित केलेल्या तक्यांमध्ये भरुन विद्यापीठात दिनांक २९/११/२०२१ ला दुपारी २.०० वाजेपर्यंत महाविद्यालयीन विभागाच्या **college.section@unigug.ac.in** या ई—मेल आय—डी वर **Excel file** मध्येच **DV-TTsurekh** या **Font** मध्ये **Soft Copy** व **Hard** कॉपीसह तातडीने विद्यापीठात सादर करावी.

तसेच ज्या महाविद्यालयांनी, महाविद्यालय स्तरावर कोवीड लसीकरणबाबतची मोहिम राबविली नाही अशा महाविद्यालयांनी मोहिम न राबविण्याचे कारण नमुद करुन स्वयंस्पष्ट अहवाल विद्यापीठात सादर करावा. कोवीड लसीकरणबाबची मोहिम न राबविणाऱ्या महाविद्यालयांवर शासनाकडुन कार्यवाही करण्यात आल्यास महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संस्थेचे अध्यक्ष/सचिव सर्वस्वी जबाबदार राहिल करीता नोंद घ्यावी.

मा. प्र—कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार

(डॉ. जी. डी. दुबे )
उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सलंग्नित :— प्रपत्र

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
६च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail :gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/ ९४६०

दिनांक २१/१०/२०२१

अत्यंत तातडीचे/कालमर्यादित

## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– कोवीड –१९ च्या अनुषंगाने महाविद्यालयातील कोवीड लसीकरणाबाबतची माहीती तात्काळ सादर करण्याबाबत

संदर्भ :– १.महाराष्ट्र शासनाकडुन दिनांक २१/१०/२०२१ रोजी आयोजित सभेतील निर्देश.
२.महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:सकिर्ण २०२१/प्र.क्र.६/विशी– दिनांक १३ /१०/२०२१

महोदय

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, कोवीड –१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती. परंतु संदर्भिय क्र २ चे शासन निर्णयानुसार राज्यातील कोवीड–१९ बाधित रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात कमी झालेली असल्यामुळे दिनांक २०/१०/२०२१ पासुन संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग सुरु करण्यात आलेले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी कोवीड –१९ च्या लसीचे डोस घेतलेले आहेत, तेच विद्यार्थी/विद्यार्थीनी विद्यापीठ व महाविद्यालयांत प्रत्यक्ष उपस्थित राहु शकणार आहे. तथापि शासन विद्यार्थ्याच्या आरोग्याची काळजी घेण्यास्तव राज्यामध्ये " मिशन युवा स्वास्थ " हे अभियान राबवित असुन सदर अभियानाअंतर्गत महाविद्यालय स्तरावर दिनांक २५ ऑक्टोंबर २०२१ ते दिनांक २ नोव्हेंबर २०२१ या दरम्यान कोवीड–१९ लसीकरण अभियान राबवायचे आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयामधील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी /विद्यार्थीनी यांचे कोवीड – १९ लसीकरणबाबतची माहीती खालील दिलेल्या लिंकवर विहीत प्रपत्रात दिनांक २२/१०/२०२१ पर्यंत दुपारी ४. ०० वाजेपर्यंत न चुकता विद्यापीठाकडे पाठवावी व त्याचा अहवाल तातडीने विद्यापीठात सादर करावा, जेणेकरुन सदर माहीती विहीत मुदतीत शासनास पाठविने सोईचे होईल.

२१/१०/२०२१

(डॉ. ए. झेड चिताडे )
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर.

Google form Link:
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf4EdYfXZ60WNCK2WnPSQfRKS5n9h6YtlUnXMCrFrFClZDIZA/viewform?usp=pp_url

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## दिनांक २५/१०/२०२१ ते दिनांक ०२/११/२०२१ या कालावधीत लसीकरण घेणाऱ्या आलेल्या विद्यार्थ्यांचा तपशिल

| अ. क्र | विभागाचे नांव | जिल्हा | महाविद्यालयाचे नांव | विद्यार्थी संख्या १८ वर्ष व त्यावरील | | मोहिमे आधी लस घेतलेल्यांची संख्या | | | | मोहिमे मध्ये लस घेतलेल्यांची संख्या | | | | एकुन लस घेतलेल्यांची संख्या | | | | टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | | विद्यार्थीनी | | विद्यार्थी | | विद्यार्थीनी | | विद्यार्थी | | विद्यार्थीनी | | विद्यार्थी | | विद्यार्थीनी | |
| | | | | | | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले | एक डोस घेतलेले | दोन डोस घेतलेले |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.jdnagpur.in
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/सर्व महा./7652 /२०२१ दिनांक : 25/11/2021

प्रति,

१. कुलसचिव,
रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/
कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ युनिवरसिटी, नागपूर.

२. संचालक/प्राचार्य/वसतीगृह प्रमुख
सर्व शासकीय संस्था/महाविद्यालय/वसतीगृह,

३. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विना अनुदानित महाविद्यालये,

**विषय : लसीकरणाचा एकत्रित अहवाल सादर करणेबाबत**

**संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२/१३६९७, दि.२४.११.२०२१**

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. (प्रत सोबत जोडलेली आहे.)

नागपूर विभागातील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतिगृहे, अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, मिशन युवा स्वास्थ या विशेष मोहिम अंतर्गत दि.२५.१०.२०२१ ते दि.०२.११.२०२१ पर्यंत विद्यापीठ/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कोविड-१९ साठी लसीकरण मोहिम राबविण्यात आलेली होती. आपल्या महाविद्यालय/विद्यापीठ येथील विद्यार्थ्यांचा लसीकरणाचा एकत्रित अहवाल सोबत जोडलेल्या एक्सेल शिट (DV-TTSurekh) मध्ये तात्काळ आजच याकार्यालयास सादर करण्यात यावा.

सहपत्र : संदर्भिय पत्र

सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत : १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.**
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२

क्रमांक-युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२ 13226 दिनांक- 24 NOV 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

**विषय- लसीकरणाचा एकत्रित अहवाल सादर करणेबाबत.**

संदर्भ- शासनपत्र क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२०९/विशि-३
दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१

उपरोक्त विषयाबाबतचे शासनपत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावे.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कोविड-१९ साठी लसीकरणाची विशेष मोहिम मिशन युवा स्वास्थ्य आरोग्य विभागाच्या सहकार्याने दिनांक २५.१०.२०२१ ते ०२.११.२०२१ या कालावधीत घेण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने लसीकरणाचे दर दिवसाचे अहवाल आपणाकडून प्राप्त करुन घेऊन ते शासनास सादर केलेले आहेत.

याबाबत शासन स्तरावरुन लवकरच आढावा घेण्यात येणार असून त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार आपल्या विभागाची माहिती या संचालनालयास दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावी.

तसेच या तक्त्यासोबत आपल्या विभागातील विद्यापीठाची माहिती सुध्दा स्वतंत्र सादर करावी.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा.श्री.प्रविणकुमार पवार, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID - archana.sawardekar@nic.in

क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२०९/विशि-३

दिनांक : २२ नोव्हेंबर, २०२१.

प्रति,

१. संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. संचालक, कला संचालनालय, मुंबई

विषय : लसीकरणाचा एकत्रिक अहवाल सादर करण्याबाबत.

संदर्भ : शासनाचे समक्रमांकाचे दि.२६ ऑक्टोंबर,२०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधिन पत्रान्वये, विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कोविड-१९ साठी लसीकरणाची विशेष मोहिम **"मिशन युवा स्वास्थ"** आरोग्य विभागाच्या सहकार्याने दि.२५.१०.२०२१ ते दि.०२.११.२०२१ या कालावधीत घेण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने लसीकरणाचे अहवाल दर दिवशी मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयात एकत्रिरित्या सादर करुन त्यांची एक प्रत विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी, यासंदर्भात लवकरच आढावा घेण्यात येणार असून त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार माहिती शासनास आजच सादर करण्यात यावी.

आपला,

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे